







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०५.०३.२०२६ | अंक नं. २७९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020












# शासनाच्या 'सौर ऊर्जा योजने'वर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांना अवाजवी 'वीजबिलांचा फटका'

## बिल कमी करून देण्यात यावे अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासून आंदोलन करणार

नगर - शासनाच्या सौर ऊर्जा योजनेवर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांनाच अवाजवी वीजबिलांचा फटका बसत असल्याची धक्कादायक प्रकरणे जिल्ह्यात समोर आली आहेत. सौर प्रकल्प बसविल्यानंतर वीजबिलात बचत होण्याऐवजी उलट लाखोंची थकबाकी दाखवून वीजपुरवठा खंडित करण्याचे इशारे दिले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून संबंधित प्रकरणांची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली.



शासनाच्या सौर ऊर्जा योजनेवर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांनाच अवाजवी वीजबिलांचा फटका बसत असल्याबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून संबंधित प्रकरणांची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली.

### ३ किलोवॅट प्रकल्पानंतरही हजारोंची थकबाकी

टाकळी काझी येथील शेतकरी श्रीमंत उर्फ सचिन म्हस्के यांनी महावितरणची विधिवत परवानगी घेऊन ३ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारला. सौर ऊर्जेमुळे वीजबिलात मोठी घट होण्याची अपेक्षा असताना, त्यांना उलट हजारोंची थकबाकी दाखवून अवाजवी बिल पाठवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे देवगाव येथील शेतकरी गुलाब मोहन वामन यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ३ किलोवॅट सौर प्रकल्प बसविला. मात्र त्यांना तब्बल ४ लाख ३२ हजार रुपयांचे अविश्वसनीय व तांत्रिकदृष्ट्या अशक्यप्राय बिल पाठवण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

### नेट-मीटरिंगमध्ये त्रुटींचा आरोप

शेतकऱ्यांच्या मते, नेट-मीटरिंगची योग्य बजावट न करणे, मीटर रीडिंगची अचूक तपासणी न करणे आणि प्रणालीतील त्रुटी वेळेत दुरुस्त न करणे या बाबींमध्ये गंभीर निष्काळजीपणा झाला आहे. सौर योजनेचा मुख्य उद्देश वीजबिलात बचत करणे हा असताना, उलट प्रचंड थकबाकी दाखविणे हे नियमबाह्य व योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासणारे असल्याचा आरोप करण्यात आला.

नेट-मीटरिंगची अंमलबजावणी योग्य पद्धतीने का होत नाही? चुकीचे बिल देऊन वीजपुरवठा खंडित करण्याचा अधिकार कोणत्या नियमांनुसार वापरला जात आहे? सौर योजनेवर विश्वास ठेवणाऱ्या शेतकऱ्यांवर आर्थिक दबाव टाकण्याचा हा प्रकार आहे का? या घटनांमुळे जिल्ह्यातील सौर प्रकल्पधारक शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांच्या ठाम मागण्या दोन्ही प्रकरणांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्यात यावी. नेट-मीटरिंगची योग्य अंमलबजावणी करून सुधारित व नियमबद्ध बिले देण्यात यावीत.

अवाजवी व चुकीची बिले तात्काळ रद्द करण्यात यावीत. विनाकारण वीजपुरवठा खंडित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. जिल्हास्तरावर नेट-मीटरिंग संदर्भात विशेष तपासणी समिती स्थापन करावी. आंदोलनाचा इशारा सौर प्रकल्प बसवणाऱ्या शेतकऱ्यांवर लाखोंची बिले लादून त्यांना आर्थिक संकटात ढकलण्याचा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. ही प्रकरणे तातडीने मार्गी लावली नाहीत तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर संबंधित बिलांमध्ये कपात करण्याची कार्यवाही करण्यात आल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. जिल्हा प्रशासन व महावितरणने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सौर योजनेवरील विश्वास अबाधित ठेवावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे व बिल कमी करून देण्यात यावे अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासून आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.







ईलाज बिना ऑपरेशन उपाय गॅरन्टीने

- वघळलेले, तुटलेले कान चिटकवा
- त्वचा- पिंपल्स,काळे डाग, व्रण, मोस काढणे, टॅटू पुसुन टाकणे, कपाळाचे गोंधण काढणे
- सगळे व्यसन दारु, मिश्री, मावा सोडा
- डाबेटीस घालवा
- HIV CD4 वाढवा

डॉ. मंजुषा
7507718246
माळीवाडा मंदिराजवळ, अ.नगर


# गायींमधील दुधाचे प्रमाण वाढविण्यासाठी अहिल्यानगरमध्ये जास्त प्रथिनांचा प्रयोग

## त्यामुळे ३१ गायींचा मृत्यू झाल्याचा पशुवैद्यकीय प्रयोगशाळेने दिला अहवाल

नगर - दुधाचे प्रमाण वाढवण्यासाठी पशुखाद्यातून प्रथिनांचा प्रमाणापेक्षा जास्त वापर केल्यामुळे 'अल्कलोसिस' (विषबाधासदृश्य) आजाराने नगर व पारनेर तालुक्यातील ३१ संकरित गायी दगावल्याचे पशुवैद्यकीय विभागाच्या प्रयोगशाळेत निष्पन्न झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. उमेश पाटील यांनी दिली.

नगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजार व लगतच्या टाकळी खातगाव तसेच पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ परिसरात गेल्या काही दिवसांत लागोपाठ ३१ गायी अज्ञात आजाराने दगावल्याने शेतकर्यांची मोठे नुकसान झाले. आमदार काशिनाथ दाते व राज्य सरकारच्या आदर्शगाव योजनेचे राज्य कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांच्याकडून चौकशीची मागणी करण्यात आली होती. जिल्हा पातळीवरील पशुवैद्यकीय विभागाच्या तपासणीत गायी दगावण्याचे कारण निष्पन्न होऊ शकले नाही. त्यामुळे दगावलेल्या गायींचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले, मात्र त्यातही नेमके कारण आढळले नाही.

त्यामुळे राज्य पातळीवरून क्रांतीसिंह नानासाहेब पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञ व पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळेच्या पथकांनी नमुन्यांची तपासणी केली. त्यामध्ये गायींना कोरडा चारा न देता दूध वाढवण्यासाठी दिल्या जात असलेल्या पशुखाद्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा अधिक असल्याचे आढळले. त्यातून 'अल्कलोसिस' (विषबाधासदृष्य) आजाराने गाईंचा मृत्यू झाल्याचे निदान करण्यात आले आहे.

पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार संकरित गायींसाठी १६ ते २० टक्क्यांपर्यंत प्रथिने आवश्यक असतात. मात्र या घटनेमध्ये वापरल्या गेलेल्या पशुखाद्यामध्ये २४ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात प्रथिने होती. गायींना कोरडा चाराही दिला जात नव्हता. त्याचा परिणाम होऊन 'अल्कलोसिस' झाले व त्यातून गाईंचा मृत्यू झाल्याचे निदान प्रयोगशाळेच्या तपासणीमध्ये करण्यात आले आहे. दगावलेल्या ३१ पैकी ३० गाई संकरित (होस्टन प्रिझन) आहेत.

गायींना संतुलित आहाराचे आवश्यकता असते. नगर व पारनेर तालुक्यातील गाई दगावल्यांच्या घटनांमध्ये पशुखाद्यातील प्रथिनांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त आढळले व कोरडा चाराही दिला जात नव्हता. त्यातून 'अल्कोलोसिस' होऊन झालेल्या आजाराला गायी बळी पडल्या. आता शेतकर्यांना गायीच्या आहारात कोरडा चारा घालण्याचा व मुरघास देतानाही त्याला बुरशी लागलेली नसेल याची काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. उमेश पाटील यांनी सांगितले.

# शारजा ते कुवेत दरम्यान समुद्रात जहाजावर अडकला अहिल्यानगर जिल्ह्यातील तरुण



गणेश जाधव

श्रीरामपूर - दुबईजवळील शारजा ते कुवेत दरम्यान सुमारे ७ ते ८ कि.मी. अंतरावर समुद्रामध्ये जहाजावर श्रीरामपूर शहरातील वॉर्ड क्र. ७ मधील पूर्णवादनगर येथील एक तरुण अडकला आहे. गणेश मुकुंद जाधव असे या तरुणाचे नाव असून तो मुंबई येथील 'द ग्रेट इस्टर्न शिपिंग कंपनी लि.' या शिपिंग कंपनीत नोकरीस आहे. त्यांच्या कंपनीचे जहाज गेल्या आठवड्यात कुवेत येथे गेले होते. हा तरुण सध्या ज्या जहाजावर आहे, त्या जहाजावर ४८ हजार टन गॅस आहे.

अमेरिकेने इराणवर हल्लाबोल केल्यानंतर जागतिक स्तरावर या युद्धजन्य परिस्थितीचे परिणाम पाहायला मिळत आहेत. त्यांचे जहाज कुवेत परिसरात असताना त्यांच्यापासून जवळच्या अंतरावर मिसाईलचे स्फोट झाले. जहाजावर मोठ्या प्रमाणात गॅस असल्याने त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने शारजा शहरापासून सुमारे सात ते आठ कि.मी. अंतरावर समुद्रामध्ये जहाज थांबविलेले आहे. त्यामुळे श्रीरामपुरात त्याचे कुटुंबीय काळजीत पडले असून, मुलाच्या सुखरूप घरी पोहोचण्याची वाट पाहत आहेत. गणेशचे वडील मुकुंद जाधव यांनी याबाबत नगर येथे जाऊन जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती दिली आहे. त्यांनीही वरिष्ठ पातळीवरून जे निर्णय होतील, त्याप्रमाणे मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.


पाहिजेत

सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे

(आकर्षक पगार)

भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर

9356352421







# कचरा न उचलल्यामुळे मनपाने ठोठावला दंड

नगर - शहरात कचरा उचलण्यासाठी महापालिकेच्यावतीने नव्याने ठेकेदार संस्थेची नियुक्ती केली आहे. शहराला इंदोरसारखे स्वच्छ शहर बनविण्याची घोषणा काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती. कचरा संकलनासाठी महापालिकेने नव्या ८० घंटागाड्या घेतल्या. मात्र, तरीही शहरातील कचरा उचलण्याचे काम ठेकेदार संस्थेकडून वेळेवर होत नाही. याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे महापालिकेने ठेकेदार संस्थेला १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

शहरात विविध ठिकाणी रस्त्यावरच कचऱ्याचे ढिग साचत असून, महापालिका नियुक्त ठेकेदार एजन्सीकडून कचरा उचलला जात नाही. त्यामुळे ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच प्रत्येक रस्त्याला स्वच्छतेसाठी कर्मचारी नेमून द्यावेत, अशी मागणी नगरसेवक व गणेश भोसले यांनी केली होती. त्यांच्या निवेदनानंतर महापालिकेचे अधिकारी व ठेकेदाराकडील सहाय्यक मुकादम यांनी पाहणी केली. या पाहणीवेळी चंदन इस्टेट रोड, राजज्योतीनगर, समर्थनगर, जुने आयटीआय गेट परिसर, तसेच भोसले आखाडा अशा ५ ठिकाणचा कचरा उचलला नसल्याचे दिसून आले. त्यानंतर ठेकेदार संस्थेस १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच शहरातील सर्व कचरा वेळेवर उचलला पाहिजे, अशी सुचना ठेकेदाराला करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

कचरा संकलनासाठी स्वयंभू एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. सर्व प्रभागातून रोज ५० कर्मचारी स्वच्छता मोहिम राबवितात. कोणीही रस्त्यावर कचरा टाकू नये, अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल, अशा सुचना महापालिकेकडून नागरिकांना देण्यात आल्या आहेत. शहरात कोठेही कचरा दिसणार नाही, याबाबत महापालिकेच्या उपाययोजना सुरु आहेत, अशी माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाचे अशोक साबळे यांनी दिली.

# जमिनीचा फेरफार रद्द करण्यासाठी लाच घेताना सेतू चालकाला पकडले

नगर - आईच्या नावे असलेल्या जमिनीचा फेरफार रद्द करण्याच्या प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी मंडलाधिकाऱ्यांना देण्यासाठी तक्रारदाराकडून ७ हजारांची लाच घेताना सेतु चालकाला नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. नेवासा खुर्द येथील सेतु केंद्रात ४ मार्च रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली आहे.

गणेश कचरू घोरपडे (वय ३१, रा.भैरवाडी, ता.नेवासा) असे पकडलेल्या सेतु चालकाचे नाव असून त्याच्या विरुद्ध नेवासा पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तक्रारदार व त्यांचा भाऊ यांच्या आईच्या नावे नेवासा बुद्रुक येथे ८० आर जमीन आहे. या जमिनीचे फेरफार रद्द करण्यासाठी त्यांनी प्रांताधिकारी यांच्या कडे अर्ज केला होता. प्रांताधिकाऱ्यांनी तो मंजूर करत फेरफार रद्द चे आदेश काढले. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी तक्रारदार १६ फेब्रुवारी रोजी नेवासा खुर्द मंडलाधिकारी कार्यालयात गेले होते. तेथे कार्यालयाबाहेर त्यांना सेतु चालक गणेश घोरपडे भेटला. त्याने मंडलाधिकारी बाबासाहेब माने यांचे कडून तुमचे काम करून देतो, पण त्यांना देण्यासाठी १२ हजार रुपये द्या अशी मागणी केली. तेव्हा तक्रारदाराच्या भावाने त्याला फोन पे द्वारे ५ हजार रुपये दिले. त्यानंतर १ मार्च रोजी गणेश घोरपडे हा तक्रारदाराला भेटला व त्याने मी तुमचे मंडलाधिकारी बाबासाहेब माने यांचे कडून काम करून दिले आहे. त्यामुळे मला उर्वरित ७ हजार रुपये द्या अशी मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. या तक्रारीच्या अनुषंगाने ४ मार्च रोजी दुपारी १२.३९ ते १२.५१ वाजेच्या कालावधीत नेवासा खुर्द येथील गणेश मल्टीसर्व्हिसेस या सेतु केंद्रात लाचमागणी पडताळणी करण्यात आली. त्यानंतर गणेश घोरपडे याला तक्रारदार यांच्या कडून मंडलाधिकारी बाबासाहेब माने यांच्यासाठी ७ हजारांची लाच घेताना पकडण्यात आले.

ही कारवाई पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे, पोलिस अंमलदार गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, वैभव सुपेकर, हारून शेख यांच्या पथकाने केली आहे.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# केस मागे न घेतल्याच्या रागातून कोयत्याने जीवघेणा हल्ला

नगर - येथील वडगाव गुप्ता परिसरातील शेवाळे मळा येथे जुन्या वादातून आणि केस मागे घेण्याच्या कारणावरून एका व्यक्तीवर आणि त्यांच्या कुटुंबावर कोयत्याने आणि लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला झाल्याची घटना वडगाव गुप्ता शिवारात ४ मार्च रोजी पहाटे ५ च्या सुमारास घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांच्या विरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विकास नाना शेवाळे (वय ४०, रा. शेवाळे मळा, वडगाव गुप्ता, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. ४ मार्च रोजी पहाटे आरोपी वैशाली दीपक शेवाळे, ओंकार दीपक शेवाळे आणि एका अनोळखी इसमाने फिर्यादी विकास नाना शेवाळे यांच्या घरी जाऊन त्यांना केस मागे घेण्याची धमकी दिली. फिर्यादीने या मागणीस नकार देताच, आरोपींनी पूर्ववैमनस्यातून हातात कोयता आणि लाकडी दांडके घेऊन फिर्यादीवर जीवघेणा हल्ला केला. या झटापटीत फिर्यादीच्या पत्नीलाही आरोपींनी मारहाण करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

या हल्लूयात गंभीर दुखापत झाल्याने फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीला उपचारासाठी शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले असून, पोलिसांनी पंचनामा पूर्ण केला आहे.

फिर्यादी विकास शेवाळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध जिवे मारण्याचा प्रयत्न व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'एसकेएफ'कडून सलग दुसऱ्या वर्षी 'प्रॉम्प्ट सेल्स'ला देशपातळीवरील 'हायेस्ट ग्रोथ डिस्ट्रीब्युटर पुरस्कार'

**अहिल्यानगरच्या औद्योगिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा**



'एसकेएफ'कडून सलग दुसऱ्या वर्षी 'प्रॉम्प्ट सेल्स'ला देशपातळीवरील 'हायेस्ट ग्रोथ डिस्ट्रीब्युटर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

नगर - इंडिस्ट्रीयल मशीनरीसाठी उच्च दर्जाच्या बेअरिंगची निर्मिती करणाऱ्या एसकेएफ या प्रतिष्ठित व जगभरात नावाजल्या जाणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीने संपूर्ण भारतात सर्वोत्कृष्ट विक्री वाढीबद्दल अहिल्यानगरचे इंडस्ट्रियल डिस्ट्रीब्युटर प्रॉम्प्ट सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हिसेसचा सलग दुसऱ्या वर्षी गौरव केला आहे. प्रॉम्प्ट सेल्सने एसकेएफच्या बेअरिंग विक्रीत सन २०२५-२६ मध्ये जवळपास २० पट वाढ करून दाखवत इतिहास निर्माण केला. त्याची दखल घेत कंपनीने प्रॉम्प्ट सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हिसेसला देशपातळीवर ग्रोथ डिस्ट्रीब्युटर ऑफ द इयर २०२५ पुरस्काराने सन्मानित केले. एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीने हा पुरस्कार दिल्याने अहिल्यानगरच्या औद्योगिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

एसकेएफ कंपनीच्या बंगलोर येथे झालेल्या देशभरातील डिस्ट्रीब्युटर्स, डिलर्सच्या स्नेह मेळाव्यात च प्रॉम्प्ट सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हिसेसचे संचालक प्रमोद विजय कंगे व पुष्कर जोशी यांचा एसकेएफ कंपनीचे प्रेसीडेंट आणि मैनेजिंग डिरेक्टर भारताचे व साउथ एशिया चे मुकुंद वासुदेवन व अश्विनी शितोळे व ध्रुव त्रिपाठी यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

या कामगिरीबद्दल बोलताना प्रमोद कंगे यांनी सांगितले की, एसकेएफ ही कंपनी सन १९०७ पासून बेअरिंग उत्पादनात आहे. भारतासह जगभरात १३० देशात या कंपनीच्या दर्जेदार उत्पादनांना मागणी असते. अत्युच्च दर्जा आणि सर्वोत्कृष्ट सेवा यामुळे या बहुराष्ट्रीय कंपनीने जगभरात नावलौकिक मिळवला आहे. प्रॉम्प्ट सेल्सकडे मागील अडीच वर्षांपासून एसकेएफची अहिल्यानगर जिल्ह्याची डिस्ट्रीब्युटरशिप आहे. कंपनीच्या उत्पादनांना नगरच्या औद्योगिक क्षेत्रात मागणी असली तरी पूर्वी काही जण डिस्ट्रीब्युटर असल्याचे भासवून एसकेएफच्या नावाखाली चीनी बनावटीच्या बेअरिंगची विक्री करायचे. यात ग्राहकांची फसवणूक होत असे. प्रॉम्प्ट सेल्सची अधिकृत व नगर जिल्ह्यातील एकमेव डिस्ट्रीब्युटर म्हणून नियुक्ती झाल्यानंतर आम्ही इंडस्ट्रीयल क्षेत्रात विश्वासार्हता वाढविण्यावर भर दिला. एसकेएफचे प वापरून खरे खोटे उत्पादन कसे तपासावे याबाबत जागृती केली. त्यामुळे औद्योगिक ग्राहकांचा विश्वास वाढून विक्रीतही अभूतपूर्व वाढ झाली. देशातील अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात जवळपास २० पटीने विक्री वाढणे हा एक मोठा विक्रमच आहे. हा पुरस्कार आमचा नसून अहिल्यानगरचा बहुमान आहे. प्रामाणिकपणे व सचोटीने काम केल्यास मोठी भरारी नक्कीच घेता येते अशा भावना कंगे यांनी व्यक्त केल्या. याकामी अहिल्यानगर एमआयडीसी येथील उद्योजकांनी 'आमी' संघटनेचे व टिएलसी यांचे सहकार्य लाभले. तसेच दौलत शिंदे, शशांक कुलकर्णी, अनंत कॅनोर, सतीश साळवेकर, कारभारी भिंगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रॉम्प्ट सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हिसेसकडे एल अ‍ॅण्ड टी इवाक, रेनॉल्ड चेन्स, कार्बोरूंडम युनिर्व्हसल, गल्फ ऑईल, अरनो जर्मनी, ड्युमेल जर्मनी, सुप्रॉन वेल्डिंग अलॉइज यांचीही डिस्ट्रीब्युटरशिप आहे.


हरणांची शिकार करणाऱ्या टोळीच्या तावडीतून २ जिवंत हरणांची सुटका केल्यानंतर त्यांच्या समवेत मिरजगाव पोलिस व वनविभागाचे पथक.

# अहिल्यानगर जिल्ह्यात हरणांची शिकार करणारी टोळी पकडली

**पोलिसांच्या गस्तीपथकाच्या सतर्कतेमुळे वाचले २ हरणांचे प्राण**

नगर - वनक्षेत्रात हरणांची शिकार करून त्यांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला असून या टोळीच्या तावडीतून ३ हरणे ताब्यात घेतली, त्यातील एकाचा अगोदरच मृत्यू झाला होता तर २ हरणांचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले आहे. कर्जत तालुक्यातील चांदे-बिटकेवाडी शिवारात हा धक्कादायक प्रकार घडला आहे.

मागील काही दिवसांपासून कर्जत तालुक्यातील मिरजगाव परिसरात रात्रीच्या वेळी चोरी व घरफोड्यांचे प्रमाण वाढले होते. त्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे तसेच कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मिरजगावचे सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी स्वतंत्र गस्त पथक नेमले होते. सदर पथक ३ मार्च रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास चांदे-बिटकेवाडी जंगल परिसरात गस्त घालत असताना दोन दुचाकींवरून जाणारे चार पुरुष व एक महिला संशयास्पद आढळले.

पोलिसांनी पाठलाग करताच एका दुचाकीवरील दोघांनी गाठोडे व दुचाकी टाकून अंधाराचा फायदा घेत पळ काढला, तर दुसऱ्या दुचाकीवरील संशयित फरार झाले. घटनास्थळी आढळलेल्या गाठोड्यांची तपासणी केली असता, त्यामध्ये शिकार करून ठार मारलेले एक हरिण तसेच पाय व तोंड बांधलेल्या अवस्थेत दोन जिवंत हरिण आढळली. यापैकी एका जिवंत हरिणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी संकेत उगले, वनरक्षक सागर वाकचौरे, आजिनाथ ननावरे, हरिभाऊ बारगजे व दिनकर लिलके यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जप्त केलेली दुचाकी, हरिण पकडण्यासाठी वापरलेली जाळी, दोरी, शाल, मोबाईल हँडसेट तसेच जिवंत व मृत हरिण असा सर्व मुद्देमाल वन विभागाच्या ताब्यात दिला. ही कारवाई प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी सुनिल खैरे, गोकुळ पळसे, राजेंद्र गाडे तसेच वन विभागाच्या पथकाने संयुक्तरीत्या केली. पोलिसांनी पळून गेलेल्या आरोपींची नावे निष्पन्न केली असून त्यांच्या विरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती सालाबादप्रमाणे मिरवणुकीने साजरी करणार


संभाजी कदम

नगर - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात ६ मार्च रोजी तिथीनुसार शिवजयंती उत्साहात आणि दिमाखदार मिरवणुकीने साजरी करण्यात येणार आहे. सालाबादप्रमाणे पारंपारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांनी सजलेली ही मिरवणूक यंदाही नगरकरांसाठी विशेष आकर्षण ठरणार असल्याची माहिती शहर प्रमुख संभाजी कदम यांनी दिली.

स्वर्गीय आमदार अनिलभैय्या राठोड यांनी तब्बल ४० वर्षांपूर्वी सुरू केलेली शिवजयंती मिरवणुकीची परंपरा आजही अविरत सुरू असून ती परंपरा शिवसेनेच्या माध्यमातून जतन केली जात आहे. या परंपरेला यंदाही भव्यतेची जोड देत नगर शहरात ऐतिहासिक आणि धार्मिक देखाव्यांची रेलचेल पाहायला मिळणार आहे.

मिरवणुकीत पारंपारिक वेशभूषा केलेले सनई-चौघडा पथक, घोडेस्वार मावळे यांचा दिमाखदार सहभाग असणार आहे. निमगाव वाघा येथील श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेचे शंभर वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात भक्तिमय वातावरण निर्माण करणार आहेत. विद्युत रोषणाईने सजविलेल्या रथावर छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आणि संभाजी महाराज यांचे जिवंत देखावे साकारले जाणार असून हे देखावे नगरकरांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहेत.

तसेच सोलापूर येथील दीडशे कलाकारांचे पारंपारिक लेझीम डाव, प्रभू राम यांची १६ फुटी मूर्ती, महाकाली आघोरी इंदोर येथील कलाकारांचा भव्य पारंपरिक देखावा यामुळे मिरवणुकीत धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाची अनुभूती मिळणार आहे. नेवासा फाटा येथून सादर होणारी ६० फुटी लांबीची नवीन आणि वेगळी विद्युत रोषणाई ही देखील यंदाची खास आकर्षण ठरणार आहे. त्याचप्रमाणे १५ फुटी आदियोगीची मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेणार आहे.

संगमनेर येथील वन्स मोर बँजोचे पंचवीस कलाकारांचे पथक आपल्या मोहक सादरीकरणाने वातावरणात जल्लोष निर्माण करणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची १२ फुटी भव्य मूर्ती आणि विविध ऐतिहासिक, सामाजिक व धार्मिक देखावे मिरवणुकीची शोभा अधिक वाढवणार आहेत.

नगर शहरातील प्रत्येक शिवप्रेमी, नागरिक, युवक-युवती तसेच कुटुंबियांनी या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी मिरवणुकीस उपस्थित राहून छत्रपतींच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन शहर प्रमुख संभाजी कदम यांनी केले आहे. नगरच्या सांस्कृतिक परंपरेचा आणि शिवभक्तीचा भव्य आविष्कार अनुभवण्यासाठी ही मिरवणूक अवश्य पाहावी, असेही त्यांनी नमूद केले.

# कुख्यात गुंड सागर मोहळकरवर गोळीबार

**चार गोळ्या लागून प्रकृती गंभीर**



जामखेड - जामखेड शहरातील नुरानी कॉलनी परिसरात बुधवारी सायंकाळी झालेल्या गोळीबाराच्या घटनेत कुख्यात गुंड सागर मोहळकर गंभीर जखमी झाला आहे. मोटारसायकलवर आलेल्या अज्ञात व्यक्तीने त्याच्यावर अंदाजे सात राऊंड गोळीबार केला. यापैकी चार गोळ्या मोहळकरच्या शरीरात लागल्याची माहिती डॉक्टरांनी दिली असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. गुरुवारी पहाटे त्याला अहिल्यानगरहून पुण्याला ससून रुग्णालयात हलविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

बुधवार (दि. ४) सायंकाळी साडेसातच्या सुमारास नुरानी कॉलनी येथील रस्त्यावर ही घटना घडली. मोटारसायकलवर आलेल्या अज्ञात व्यक्तीने अंधाराचा फायदा घेत गावठी कट्ट्यातून सागर मोहळकरवर गोळीबार केला. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मोहळकर हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. हल्लेखोर अंधाराचा फायदा घेत मोटारसायलवरुन पसार झाला. या घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी जमली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी मोहळकर याला प्रथम ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्रथमोपचार केल्यानंतर त्याला शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्या शरीरात चार गोळ्या असल्याचे सांगितले असून एकूण सात राऊंड फायर झाले असावेत, असे सांगण्यात येते.

दरम्यान त्याच्यावर हल्ला का झाला, याची निश्चित माहिती समजू शकली नाही. या प्रकरणी जामखेड पोलिसांनी तपास सुरू केला असून हल्लेखोराचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. मोहळकरची प्रकृती गंभीर असून, अहिल्यानगरहून गुरुवारी पहाटे त्याला पुण्याला ससून रुग्णालयात हलविण्यात आल्याचे जामखेडचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी सांगितले.

सागर मोहळकर हा अनेक गुन्ह्यांमध्ये आरोपी असून तो नुकताच नाशिक मध्यवर्ती कारागृहातून जामिनावर बाहेर आला होता. तीन-चार दिवसांपूर्वी त्याच्यावर जामखेड पोलीस ठाण्यात एक तक्रार दाखल झाली होती. जामखेड परिसरात त्याची मोठी दहशत असल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जाते.

### कुस्तीच्या फडातून गुन्हेगारी क्षेत्रात

सागर मोहळकर हा पुण्यातील कुख्यात गुंड नीलेश घायवळ याच्या कानशिलात लगावल्यानंतर चर्चेत आला होता. धाराशिव इथल्या भूम तालुक्यातील आंदरुड गावच्या यात्रेत ११ एप्रिल २०२५ रोजी मोहाळकर याने घायवळ याच्या कानशिलात लगावली होती. यानंतर त्याची गुन्हेगारीची पार्श्वभूमी अधिकच चर्चेत आली. तो कुस्तीच्या फडातून गुन्हेगारी क्षेत्रात उतरला होता. त्यावर खुनाचे दोन गुन्हे दाखल आहे.

# गुणे आयुर्वेद रूग्णालयात ८ मार्चला मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

नगर - जगातील महिला दिनाचे औचित्य साधून शहरातील गांगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालयात ८ मार्च रोजी मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे. सकाळी १० ते दुपारी १ वाजे पर्यंत या शिबिरात महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. सचिन जगताप यांनी दिली.

या शिबिरात तज्ज्ञ स्त्री चिकित्सकांच्या माध्यमातून महिलांची विशेष चिकित्सा करण्यात येणार आहे. यामध्ये मधुमेह, मुळव्याध, भगंदर, स्त्रियांचे मासिक पाळीचे आजार, जुनाट आजार, कान, नाक, घसा, डोळे यासंबंधी तपासणी करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये सर्व औषध व तपासणी मोफत करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय लोडे यांनी दिली. अधिक माहिती साठी ९८९०१८७४७५ व ९८२२८५४५४२.

# नेप्ती नाका परिसरातून बांधकाम साहित्याची चोरी

नगर - शहरातील कल्याण रोडवरील नेप्ती नाका चौकात असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी बांधकामासाठी लागणारी मशिनरी चोरून नेल्याची घटना ३ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ४ मार्च रोजी पहाटे २ या कालावधीत घडली आहे. याबाबत मधुकर बन्सी कोतकर (वय ५९, रा. केडगाव, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांनी बांधकामाच्या ठिकाणाहून ब्रेकर मशीन, स्टील कटर, प्लाय कटर, हॅमर, ड्रिल मशीन आणि ब्लेड कटरचा बॉक्स असे एकूण १० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले आहे. सकाळी काम सुरू करताना चोरीचा प्रकार लक्षात येताच फिर्यादीने तत्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश चव्हाण करत आहेत.

# संजय काटकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नागरदेवळे काटकर मळा येथील रहिवासी संजय रामचंद्र काटकर (वय ५६) यांचे ५ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. सुनंदा काटकर यांचे ते पती तर राहुल काटकर यांचे वडील होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**शुक्रवार दि. ६/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**गोपालशेठ भागचंदानी, राजुशेठ बजाज परिवार,**
चैतन्यनगर, प्रोफेसर कॉलनी, जॉगिंग पार्क जवळ,
जगदिश भागचंदानी, दिपक भागचंदानी ९४२३७५०६८१
राजुशेठ बजाज ८९९९६२६८६३

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**सतिशशेठ गुजराथी,** श्री वसंत विहार कॉलनी, नक्षत्र लॉन मागे, फुलसौंदर मळा, बुरुडगाव रोड सतिशशेठ गुजराथी ९४२२२२५९५९

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**
**चंद्रभानजी आत्मारामजी अग्रवाल**
साई प्रसाद, गोमाता चौक, आनंदऋषीजी मार्ग, बुरुडगाव रोड ९९७०१७९७००

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**
**श्री. सुनील चेनसुखलालजी गुगळे,** (गल्फ ऑईल) रजनीगंधा अपार्टमेंट मित्र मंडळ, इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयाजवळ, म.फुले चौक

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**
**श्री रामदेवरा दरबार,** सारसनगर

# देवाच्या दारात राजकारण नको

**श्रद्धा-विकासाची त्रिसूत्रीच पुढे नेऊ या : खासदार निलेश लंके यांचे आवाहन; मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गड मंदिरात कलशारोहन सोहळ्याचा प्रारंभ**


मांजरसुंबा येथील चैतन्य गोरक्षनाथ गड मंदिरात कलशारोहन सोहळ्याचा ध्वजपूजनाने शुभारंभ करताना खा.नीलेश लंके व उपस्थित मान्यवर.

नगर - आदर्श गाव मांजरसुंबा येथील चैतन्य गोरक्षनाथ गड मंदिरात कलशारोहन कार्यक्रमानिमित्त आयोजित तीन दिवसीय कीर्तन सोहळ्याला धार्मिक वातावरणात उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते ध्वजपूजन करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली.

ह.भ.प. ईश्वर महाराज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नवनाथ पारायणास प्रारंभ झाला असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन-भजनाचा लाभ घेत आहेत.

सोहळ्याच्या निमित्ताने विविध संतांची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. ५ मार्च रोजी ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे, ६ मार्चला जंगले महाराज शास्त्री यांची कीर्तन सेवा पार पडणार आहे. ७ मार्चला महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते कलशारोहन सोहळा पार पडेल. त्यानंतर काल्याचे कीर्तन होणार आहे.

ध्वजपूजनानंतर बोलताना खा. लंके म्हणाले, श्री क्षेत्र गोरक्षनाथ देवस्थान हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथे येणाऱ्या भाविकांच्या सुविधा वाढवण्यासाठी दोन कोटी रुपयांचा विकास प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांना किमान दोन कोटी रुपयांचा निधी मिळावा, यासाठी मी प्रयत्नशील आहे.

खा. लंके पुढे म्हणाले , सरकारमध्ये काही अडचणी असतात; मात्र देवाच्या कृपेने काट्यातूनही मार्ग निघतो, असे सांगत त्यांनी नाथ परंपरेच्या खडतर प्रवासाचा उल्लेख केला. आपण नाथांच्या भूमीत जन्मलो आहोत. गोरक्षनाथ देवस्थानाचे रूपांतर 'नंदनवनात' करण्याचा आपला निर्धार आहे, असे ते म्हणाले.

देवाचा दरबार म्हणजे ड्रोन कॅमेरा आहे; तो प्रत्येकाचा हिशोब ठेवतो. त्यामुळे श्रद्धेने आणि प्रामाणिकपणे काम करा. देव कोणालाही माफ करत नाही; पण प्रामाणिकांना साथ देतो, असे सांगत त्यांनी देवस्थान ट्रस्टच्या कार्याचे कौतुक केले. गावकऱ्यांनी एकजुटीने राहून देवस्थानाचा चेहरामोहरा बदलावा, असे आवाहनही त्यांनी केले.

ज्या गावातील मंदिरे सुदृढ आहेत, ते गाव गुण्यागोविंदाने नांदते. जिथे मंदिरे दुर्लक्षित असतात, तिथे वाद-विवाद निर्माण होतात. त्यामुळे श्रद्धास्थानांचे जतन हेच गावाच्या ऐक्याचे प्रतीक आहे. देवाच्या दारात राजकारणाला स्थान नाही; श्रद्धा, एकजूट आणि विकास या त्रिसूत्रीवर काम करणे आवश्यक आहे, असे लंके यांनी स्पष्ट केले.

या वेळी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे आमच्या तीन पिढ्यांचे श्रद्धास्थान आहे. माझ्या वडिलांनी येथे वीज पोहोचवली; आमदार असताना मी मंदिर रस्ता आणि स्ट्रीटलाईटचे काम मार्गी लावले. आजचा कलशरोहन सोहळा ही अध्यात्मिक परंपरेची शान आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास माजी सभापती रघुनाथ झिने, गोविंद मोकाटे, जयराम कदम, मारुती कदम, डॉ. राम कदम, नगरसेवक योगीराज गाडे, रामेश्वर निमसे आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उसाचा रस प्या पण...

उसाचा रस आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो, पण उन्हाळा येण्यापूर्वी तो पिण्यास सुरुवात करणे योग्य आहे का? या फेब्रुवारी हंगामात उसाचा रस पिणे तुमच्या आरोग्यासाठी कसे चांगले आहे? कोणत्या काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत? जर तुम्ही चवीसाठी उसाचा रस पीत असाल तर दिवसा थोडासा चाखण्याचा प्रयत्न करा, म्हणजे जेव्हा हवामान खूप गरम असेल. जर तुम्ही या हंगामात उसाचा रस पीत असाल तर त्यात बर्फ घालू नका. यामुळे घसा खवखवेल आणि तुम्ही आजारी पडू शकता. जर तुम्ही उसाचा रस पीत असाल तर त्यात लिंबाचा रस किंवा थोडे आले घालून प्यावे, जेणेकरून तुम्हाला कोणतेही नुकसान होणार नाही. आजकाल, तुम्ही दररोज उसाचा रस पिण्याची सवय लावू नये. एका वेळी १००-२०० मिली पेक्षा जास्त उसाचा रस पिऊ नये.

## पाककला

### कच्च्या केळीचे लच्छे

**साहित्य :** सहा कच्चे केळ, अर्धा चमचा तिखट, १/४ चमचा काळे मीठ, १/४ चमचा चाट मसाला, सहा चमचे काजू, तीन चमचे कापलेली हिरवी मिर्ची, एक बारीक कापलेला कांदा, एक चमचा तांदळाचे पीठ, १/४ चिली फ्लेक्स, एक चमचा तीळ, तेल

**कृती :** कच्चा केळाचे लच्छे बनवण्यासाठी कच्चा केळाचे साल काढून मोठ्या किसणीने किसून घ्या. आता या किसाला तांदळाच्या पिठामध्ये मिक्स करा. आता पण मध्ये तेल गरम करून डीप फ्राय करावा. आता याला बटर पेपरवर टाकावे. आता परत पॅनमध्ये थोडेसे तेल टाकून त्यामध्ये हिरवी मिर्ची, कांदा परतवून घ्यावा. मग त्यामध्ये काजू आणि तीळ घालावी. मग यामध्ये तळलेला किस घालवा वर सर्व मसाले घालून परतवावे. व गार्निश करीत कोथिंबीर घालावी. चहा बरोबर खाण्यास तयार आहेत.

## वास्तू

### पुर्वजांच्या चित्रासंबंधी...

जर तुमच्या घरात तुमच्या पूर्वजांचे चित्र असतील, परंतु तुम्ही ते भिंतीवर लटकवत राहिलात तर यामुळे तुमच्या आयुष्यात पितृदोष येऊ शकतो. शिवाय, जर तुमच्या घराच्या भिंतींवर लटकलेले चित्र वारंवार पडले किंवा धुळीने झाकलेले असतील तर हे पूर्वजांकडून एक संकेत आहे की त्यांना आदर आणि आदर मिळत नाही. अशा परिस्थितीतही तुमच्या घरावर पितृदोषाचा परिणाम होऊ शकतो.

## सौंदर्य

आपण दिवसभर डोळ्यांचा वापर करत असल्याने ते थकतात. त्यामुळे डोळ्याचे सौंदर्य कमी होते. अशा थकलेल्या डोळ्यांसाठी कोरफड अतिशय उपयुक्त ठरते. कोरफडीच्या रसाचे आईस क्यूब करुन ते डोळ्यांखाली ठेवावेत.

## सल्ला

हाताला येणारा लसणाचा वास घालवण्यासाठी हात स्टिलच्या भांड्याला घासावेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, हस्त ०९।३०, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील. व्यवसाय क्षेत्रात अधिकारी व सहकारी नकारात्मक वागतील.

**वृषभ :** आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. गृहिणी आज असंतुष्ट राहतील.

**मिथुन :** मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क :** विशेषतः धंदा-व्यवसाय करण्याऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो.

**सिंह :** भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही. मित्र व स्नेही भेटल्यामुळे आनंदात असाल.

**कन्या :** रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ :** आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत. सरकार विरोधी कारवायांपासून दूर राहणच आज फायदेशीर होईल.

**वृश्चिक :** शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल. मातेचे स्वास्थ्य बिघडू शकते.


**धनु :** प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल. धन आणि किर्तीची हानी होईल.

**मकर :** हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ :** आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे. कामात सांभाळूनच पुढे चला.

**मीन :** जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

## फिल्मीचक्कर क्र. १२२७ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) 'चोरी चोरी' चित्रपटातील एक गीत - ++ ++++++ मधुर चांदनी मे हम तुम मिले ५) अभी तो हाथ मे जाम है तौबा ये कितना काम है कभी मिली फुरसत तो (गाणे) ७) धर्मेंद्र, मुमताज यांचा एक चित्रपट ९) अमिताभ, झीनत अमान, रणजीत, राम सेठी यांचा एक चित्रपट ११) अमिताभचे 'शोल'मधील नाव १२) राजू ++ गया जंटलमन (चित्रपटाचे नाव) १३) +++ दीवानी (चित्रपटाचे नाव) १५) ++ दूजे के लिये (चित्रपटाचे नाव) १७) स्त्री या अर्थाचा शब्द १९) अशोक +++ (अभिनेत्याचे नाव) २१) +++ खान (संवाद लेखक जोडीतील एक) २२) कल क्या होगा किसको पता अभी जिंदगी का ले लो ++ (गाणे)

**उभे शब्द :-** १) राजेश खन्ना, आशा पारेख, विनोद खन्ना यांचा एक गाजलेला चित्रपट २) ++ देओल (अभिनेत्याचे नाव) ३) मोगल ए आझम चित्रपटाची नायिका ४) जुन्या काळातील एक दिवंगत व प्रसिद्ध संगीतकार ६) बॉबी देओल, नेहा यांचा एक चित्रपट ८) काही वर्षांपूर्वी दूरदर्शनवर गाजलेली एक मराठी मालिका १०) ++++ इंडिया (चित्रपटाचे नाव) १४) जितेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट १६) +++ खून की (चित्रपटाचे नाव) १८) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) २०) रातों का ++ (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** दुसऱ्यांच्या चुकांतून शिकणे यातच कमी जोखीम आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### अतीप्रमाणात पाणी प्यायल्यास काय होते?

असं म्हणतात की , पाणी पिणं आरोग्यासाठी फायदेकारक असत. चेहऱ्यावर ग्लो येण्याची बाब असो किंवा निरोगी राहण्यासाठी आरोग्य तज्ञ दोघांसाठी पाणी पिण्याचा सल्ला देतात, परंतु तुम्हाला माहित आहे का की जास्त पाणी पिणे तुमच्यासाठी घातक ठरू शकते.आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी प्याल तर तुम्हाला ओव्हरहायड्रेशनची समस्या उद्भवू लागते. या मुळे आरोग्याचे नुकसान होतात चला तर मग जाणून घ्या.

किडनीसाठी धोकादायक - ओव्हरहायड्रेशनमुळे आपली किडनीही खराब होते. वास्तविक, जेव्हा आपण जास्त पाणी पितो तेव्हा त्यामुळे आर्जिनिन व्हॅसोप्रेसिनची प्लाझ्मा पातळी कमी होते. ज्याचा थेट परिणाम किडनीच्या कार्यक्षमतेवर होतो.ते किडनीसाठी धोकादायक आहे.

इलेक्ट्रोलाइटचे प्रमाण कमी होते - जास्त पाणी प्यायल्याने शरीरातील मीठ आणि इलेक्ट्रोलाइटचे प्रमाण कमी होते. त्याच वेळी, यामुळे पोट फुगणे तसेच उलट्या, डोकेदुखी सारख्या समस्या उद्भवतात. याशिवाय प्रकृती बिघडल्यास व्यक्तीबेशुद्ध ही होऊ शकते.

पेशींमध्ये सूज येते- जास्त पाणी प्यायल्यास पेशींमध्ये सूज येऊ शकते जी आरोग्यासाठी खूप धोकादायक असते. या स्थितीमुळे स्नायूंच्या ऊती आणि मेंदूचे नुकसान यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.

मेंदूवर परिणाम - ओव्हरहायड्रेशन मुळे सोडियमच्या कमी पातळीमुळे मेंदूच्या पेशींना सूज येते. आणि बोलणे कठीण होते आणि नीट चालता येत नाही.

यकृताला नुकसान होऊ शकते - जास्त लोहयुक्त पाणी वापरता, तेव्हा ते ओव्हरहायड्रेशनच्या स्थितीसाठी देखील जबाबदार असते. ज्यामुळे यकृताशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

हृदयाला धोक -

जास्त पाणी प्यायल्यास शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते, ज्यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांवर थेट दबाव पडतो. या अनावश्यक दबावामुळे हृदय बंद पडण्याचा धोका निर्माण होतो.

## किंमत माणसाची

एका गावात लोखंडाच्या दुकानात वडिलांसोबत काम करणाऱ्या एका मुलाने अचानक वडिलांना विचारले - बाबा, या जगात माणसाची किंमत काय आहे? एका लहान मुलाचा इतका गंभीर प्रश्न ऐकून वडील आश्चर्यचकित झाले.

मग ते म्हणाला, बेटा, माणसाची किंमत मोजणे खूप कठीण आहे, तो अमूल्य आहे.

मुलगा म्हणाला, या सर्व समान मौल्यवान आणि महत्वाचे आहे का? वडील म्हणाले हो बेटा. मुलाला काहीच समजले नाही आणि त्याने पुन्हा विचारले - मग या जगात काही गरीब आणि काही श्रीमंत का आहे? कोणी कमी आदरणीय आणि कोणी जास्त का? प्रश्न ऐकून वडील काही वेळ गप्प राहिले आणि नंतर मुलाला स्टोअर रूममध्ये पडलेला लोखंडी रॉड आणण्यास सांगितले. काठी आणताच वडिलांनी विचारले - त्याची किंमत काय असेल?


मुलगा म्हणाला २०० रुपये.

वडील म्हणाले जर मी त्यातून अनेक लहान खिळे बनवले तर त्याची किंमत काय असेल? मुलाने थोडा वेळ विचार केला आणि म्हणाला - मग ते जास्त किमतीला विकले जाईल, सुमारे १००० रुपयांना. वडील म्हणाले जर मी या लोखंडापासून बरेच घड्याळ स्प्रिंग बनवले तर?

मुलगा थोडा वेळ मोजत राहिला आणि मग अचानक उत्साहित झाला आणि म्हणाला, मग त्याची किंमत खूप जास्त होईल.

मग वडिलांनी त्याला समजावून सांगितले - तसेच, माणसाचे मूल्य तो सध्या काय आहे यात नाही तर तो स्वतःला काय बनवू शकतो यात असते. मुलाला त्याच्या वडिलांचे म्हणणे समजले होते.

तात्पर्य : अनेकदा आपण आपले खरे मूल्य ठरवण्यात चुका करतो. आपले मूल्य जाणावे.



## जीवन का अमृत (भाग १)

पेड़ पर फल लगने से पहले हमेशा उस पर फूल आते हैं, जो अंत में फल बन जाते हैं। इसमें समय जरूर लगता है।

सत्गुरु हर दुख-सुख में शिष्य को सँभाले रखता है। यह दिव्य रास्ता है। उसके प्रति अपने प्रेम और श्रद्धा को कभी भी न डगमगाने दो। सत्गुरु शिष्य को तब तक नहीं छोड़ता, जब तक वह अपने परम पिता के सच्चे घर नहीं पहुँच जाता ।

४३. जब कोई सत्गुरु की इच्छा के आगे समर्पण कर देता है और अपने आपको सत्गुरु के संरक्षण में छोड़ देता है, तो सत्गुरु शिष्य की दिव्यता को तेज़ी से जगाता है। सत्गुरु एक बार शिष्य को अपना लेने के बाद कभी नहीं छोड़ता, जब तक उसे प्रभु तक न ले जाए, जिसका कि प्रतिरूप इस धरती पर वह स्वयं है। वह अपने भक्त से आमने-सामने होकर बात करता है और जरूरत पड़ने पर उसे सलाह देता है। वह शिष्य को प्रभु के रूप में डाल देता है और उसे दिव्य चेतनता का जीता-जागता मांदर बना देता है। ४२. यह धारणा सही नहीं है कि पुराने सत्गुरु दोबारा मानव चोले में आकर इंसानियत की सहायता करेंगे। जैसा कि आप जानते हैं क्राईस्ट शक्ति, गुरु-शक्ति या प्रभु शक्ति तो एक ही है, पर वह अलग-अलग इंसानी चोलों में काम करती रहती है। जब क्राईस्ट- शक्ति किसी एक इंसानी चोले में काम करती है, तो जो कोई भी उसके पास प्रेम और भक्ति से आता है, उसके लिए वह सहायता का साधन बन जाती है।

### उनका प्रतिरुप

४४. सत्गुरु के प्रति अपने प्रेम की खातिर ही हम सत्गुरु की वस्तुओं से भी प्रेम करते हैं; क्योंकि सत्गुरु प्रेम और दया देहधारी है। उससे नजदीकी हमें लगातार याद दिलाती है और प्रोत्साहित करती है कि हम उसके और नज़दीक आयें। धन्य हैं वे लोग, जिन्हें ऐसा अनूठा अवसर मिला है और वे इसका सही प्रकार से फायदा उठाते हैं।

सत्गुरु को अपने सभी बच्चों से प्रेम होता है और वे सब उसकी दया

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

याचं कारण त्या नात्याचा पाया कमकुवत असताना आपण फक्त इमारत बांधण्यावर लक्ष केंद्रित करतो. भूकंपाचा एखादा हादरासुद्धा ही इमारत पाडू शकतो. मग पुन्हा आपल्याला ती पहिल्यापासून बांधावी लागेल. म्हणून आजपासूनच नात्यांचा पाया (विचार) भक्कम करण्याकडे लक्ष द्यायचं आहे आणि असं केलं तर इमारतीची (शब्द आणि कर्म) काळजी आपोआपच घेतली जाईल.

सुरेश ओबेरॉय : चला, आपल्या नात्यांचा पाया भक्कम करण्यासाठी ध्यान करू या. शिवानीदीदी : अवश्य.

ध्यान आणि चिंतन मला स्वतःला पाहायचं आहे... मी एक आत्मा आहे, एक अशी शक्ती जी दिवसभर विचार करते... आजपासून संपूर्ण दिवस मी ही सजगता कायम ठेवेन की माझा प्रत्येक विचार ऊर्जा निर्माण करतो, जो जगामध्ये प्रसारित होतो. मला स्वतःला पाहायचं आहे... हे पाहायचं आहे की दिवसभरात मी इतरांबद्दल कोणत्या प्रकारचे विचार निर्माण करतो... ते (इतर) कसेही वागत असले तरीही माझे त्यांच्याबद्दलचे विचार कसे आहेत... आजपासून मला ह्याची जाणीव असेल की मी इतरांबद्दल निर्माण करत असलेले विचार हेच त्यांच्या सोबत असलेल्या माझ्या नात्याचा पाया आहेत... ह्या पायामध्ये मी जी भर घालेन ती माझी निवड असेल... आज संपूर्ण दिवसभरात, इतरांबद्दल माझ्या मनात कोणते विचार येतात ते मी प्रेमपूर्वक तपासेन आणि हळूहळू त्यांमध्ये बदल करेन... माझ्या नात्यांचा पाया ही माझी निवड आणि निर्मिती आहे...

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

... आजपासून ह्या पायामध्ये ज्या विचारांची भर मी घालेन ते शुद्ध, निर्मळ आणि प्रेमळ असतील... ओम शांती!

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

कोणतंही नातं हे सगळ्या लेबल्सच्या आणि पालक-मुलं, नवरा-बायको अशा ओळखींच्या पलीकडचं असतं. हा दोन आत्म्यांमधला बंध असतो.

नातं हे आपण एकमेकांशी काय बोलतो आणि कसे वागतो यांवरच अवलंबून नसतं तर आपण एकमेकांविषयी कोणता विचार करतो आणि काय अनुभवतो यांवर अवलंबून असतं. नातं म्हणजे दोन आत्म्यांतील विचारांच्या ऊर्जेची देवाण-घेवाण. आपले विचार हाच आपल्या नात्यांचा पाया आहे. आपण आपले विचार लपवू शकत नाही, ते लोकांपर्यंत पोहोचतातच. आपण इतरांबद्दल जसा विचार करतो, तसाच विचार इतरांच्या मनात आपल्याबद्दलदेखील येतो.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पक्या आणि मक्या एकदा जेवणाच्या पंगतीत जेवत असतात तेव्हा त्यांना एक माणूस विचारतो, तुम्ही कोण??

पक्या :- मी मुलाकडून आलोय? मक्या : मी मुलीकडून आलोय?

वाढणारा माणूस :- चपलीने हानीन साल्यांनो हे 'तेराव्याच' जेवण आहे!!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रेखा गुप्ता या नवी दिल्लीच्या कितव्या मुख्यमंत्री आहेत?

- ४ थ्या

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## केळ

सर्व फळांमध्ये केळ हे अधिक उष्मांक देणारे फळ आहे. केळामध्ये नैसर्गिकरीत्या असलेली साखर ही सहज पचणारी असल्याने शरीराचा थकवा जाऊन लगेचच उत्साह निर्माण होतो. म्हणून केळाची गणना शक्तिवर्धक फळांमध्येही होते.

आधुनिक शास्त्रानुसार : केळ हे शरीरातील कॅल्शिअम, नायट्रोजन व फॉस्फरस यांचे प्रमाण टिकवून ठेवते. त्यामुळे स्नायू, मांसपेशी बळकट होऊन शरीर कार्यक्षम बनते. म्हणून केळ हे आरोग्यवर्धक, बलदायक फळांमध्येही गणले जाते.

उपयोग : १) केळामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असल्यामुळे रक्ताची कमतरता (naemia) असणाऱ्यांनी रोज एक केळ खाणे फायदेशीर ठरते. केळामुळे रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढते.

२) केळामध्ये कॅल्शिअम, लोह भरपूर प्रमाणात असल्याने हाडांचा ठिसूळपणा (ऑस्टिओपोरॉसिस) हा आजार टाळण्यासाठी रोज एक केळ खावे.

केळी बाराही महिने खाता यावीत म्हणून उन्हाळ्यामध्ये कच्च्या केळीची साले काढून आतील गर वाळवून घ्यावा. या गराचे पीठ तयार करता येते. उपवासाच्या दिवशी या पिठापासून भाकरी किंवा थालीपीठ बनवून खाता येते.

पिकलेल्या केळींची साल काढून ती स्वच्छ धुऊन त्याची भाजी बनवून खावी, कारण केळींच्या सालीमध्ये फायबर व जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. तसेच कच्च्या केळीची भाजी करावी, त्याचप्रमाणे केळफुलाचीही भाजी बनविता येते. पौष्टिक, सकस आहार म्हणून लहान मुलांना रोज एक केळ खाण्यास द्यावे. सहसा बालकांना केळ हे दुपारच्या वेळेस खाण्यास द्यावे. त्यांना सर्दी- खोकल्याचा त्रास होऊ नये म्हणून शक्य असल्यास मधाच्या चाटणाबरोबर केळ खाण्यास द्यावे. मलावष्टंभाचा त्रास असेल, तर केळ खाल्ल्याने पोट साफ होण्यास मदत होते. कारण केळ खाल्ल्याने स्नायूंची हालचाल, आकुंचन-प्रसरण व्यवस्थित होऊन आतड्यांमध्ये साचलेला मळ पुढे ढकलण्यास मदत होते.

जर आंत्रव्रण (कोलायटिस) आजार झाला असेल, तर अतिरिक्त आम्लांचा विषारी प्रभाव केळ खाल्ल्याने नाहीसा होतो. कारण केळामध्ये आतड्यांना आतून एक संरक्षक थर जमा होतो व त्यामुळे आंत्रव्रण भरून येण्यास मदत होते व पोटात पडणारी आग कमी होऊन रुग्णास उपशय मिळतो.

कृश व्यक्तींनी वजन वाढवायचे असेल, तर रोज दुपारी चार केळी खावीत. यामध्ये भरपूर उष्मांक असल्याने महिन्याभरात वजन वाढते. केळामध्ये कमी प्रथिने, कमी क्षार आणि उच्च प्रतीचे पिष्टमय पदार्थ (कार्बोहायड्रेट्स) असल्याने मूत्रपिंडाचे विकार दूर करण्यासाठी केळी उपयुक्त ठरतात. सूर्याच्या प्रखर उष्णतेने किंवा आगीच्या चटक्यांनी होणारी शरीराची आग थांबविण्यासाठी त्वचेवर केळाचा गर लावावा, यामुळे शरीराचा दाह कमी होऊन लगेचच आराम वाटतो. केळीमध्ये 'अ' 'क' व 'एच' जीवनसत्त्व असल्यामुळे त्वचा, दात यांच्या विकारांवर केळी उपयुक्त ठरतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेचा आदर्श मॉडेल

### मिलापचंद पटवा यांचे प्रतिपादन; जनरल सर्जरी शिबिरात ६० रुग्णांची मोफत तपासणी



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित जनरल सर्जरी शिबिराचे उद्घाटन करताना मिलापचंद पटवा.

नगर – मागील पंचवीस वर्षांपासून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने रुग्णसेवा अविरत सुरू आहे. या सेवेत कार्य करण्याचे भाग्य लाभल्याचा आनंद होत असून सर्वसामान्य रुग्णांची काळजी घेऊन हॉस्पिटलने नागरिकांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल ठरले असल्याचे प्रतिपादन भगवान महावीर भोजनालयाचे संचालक मिलापचंद पटवा यांनी केले. या सेवेत योगदान देताना त्यांचे डोळेही पाणावले.

आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित जनरल सर्जरी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रुपेश पटवा, अमित पटवा, लीलाबाई पटवा, नम्रता पटवा, निकिता पटवा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, जनरल सर्जन डॉ. प्रवीण मुनोत, डॉ. विवेक भापकर आदी उपस्थित होते.

मिलापचंद पटवा पुढे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांचीही सोय व्हावी या उद्देशाने भगवान महावीर भोजनालयाच्या माध्यमातून अल्पदरात सात्विक व पोटभर जेवण दिले जाते. या भोजनालयाचा दररोज दीड ते दोन हजार नागरिक लाभ घेत आहेत. १४ वर्षांपासून ही सेवा सुरू असून सेवाभावाने केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. हॉस्पिटलमध्ये येणारा रुग्ण उपचार घेऊन बरा होऊन बाहेर पडतो, हीच सेवाकार्याची खरी समाधानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या जनरल सर्जरी शिबिरामध्ये ६० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच गरजू रुग्णांवर अपेंडिक्स, इन्वायनल हर्निया, हायड्रोसिल यांसारख्या शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात करण्यात येणार आहेत. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सुभाष मुनोत यांनी आभार मानले.



राष्ट्रीय स्तरावर नेत्रदिपक यश मिळविणारे शशीकला अबॅकस अकॅडमीचे विद्यार्थी.

# शशीकला अबॅकस अकॅडमीचे राष्ट्रीय स्तरावर नेत्रदिपक यश

नगर – पुणे येथे १४ व १५ फेब्रुवारी रोजी झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये अहिल्यानगर येथील शशीकला अबॅकस अकॅडमीच्या २९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेमध्ये अनंत पोटे, सिध्दांत त्रिपाठी, तनय पोटे, शनाया पोटे, स्पर्श पोटे, आरिज पटेल, नीरज गरदास हे सात विद्यार्थी चॅम्पियन ऑफ चॅम्पीयन झाले आहेत. पाच विद्यार्थी प्रथम पुरस्कार विजेते ठरले, पाच विद्यार्थ्यांना दुसऱ्या नंबरचा पुरस्कार मिळाला. सहा विद्यार्थी तिसऱ्या क्रमांवर तर सहा विद्यार्थी चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तसेच नऊ विद्यार्थ्यांना १० लेवल पुर्ण केल्याबद्दल ग्रॅज्युएशन प्राप्त झाले. अकॅडमीला एकूण ४० ट्रॉफीज् मिळाल्या आहेत. तसेच बेस्ट फ्रँचाइजी म्हणून शशीकला अकॅडमीला अ‍ॅवॉर्डही मिळाले.

या सर्व विद्यार्थ्यांना अकॅडमीच्या संचालिका शशीकला सोनी–बियानी तसेच टयुटर अनुजा देशपांडे, सौ. रेणूका वंगार, सौ. गौरी कुलथे, सौ. अंजु भंडारी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



अय्यप्पा मंदिरात केरळ राज्यातील अट्टुकल पोंगल उत्सव भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मंदिर परिसरात पारंपरिक वेशभूषेत महिला भाविकांनी चुलीवर पोंगल तयार करून देवाला अर्पण केले.

# अय्यप्पा मंदिरात अट्टुकल पोंगल उत्सव साजरा

## महिला भाविकांचा सहभाग

नगर – शहरातील अय्यप्पा मंदिरात केरळ राज्यातील अट्टुकल पोंगल उत्सव भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मंदिर परिसरात पारंपरिक वेशभूषेत महिला भाविकांची गर्दी झाली होती. अय्यप्पा स्वामींची पूजा करून पोंगल तयार करण्यासाठी महिलांनी मंदिर प्रांगणात रांगोळ्या काढून स्वतंत्र चुली मांडल्या आणि त्यावर स्वतः पोंगल तयार केला. गूळ, तांदूळ, नारळ, तुप, मध व सुकामेवाचा वापर करून बनवलेला स्वादिष्ट गोड पोंगलचा नैवेद्य मनोभावे मंदिरातील अय्यप्पा स्वामी, सिद्धिविनायक गणपती व सरस्वती देवी यांना अर्पण करून सुख, शांती, आरोग्य, संरक्षण व समृद्धीसाठी प्रार्थना केली.

केरळमधील तिरुवनंतपुरुमच्या अट्टुकल भगवती मंदिर होणाऱ्या प्रसिद्ध उत्सवाच्या धर्तीवर अहिल्यानगरमध्येही अट्टुकल पोंगल हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला गेला. अय्यप्पा मंदिर परिसरात केरळच्या पारंपरिक पद्धतीने महिला भाविकांनी चूल मांडून त्यावर मातीच्या भांड्यात पोंगल तयार केले. चुली पुढे केळीच्या पानावर पूजा मांडण्यात आली. चुलीसाठी फक्त नारळाच्या वाळलेल्या काड्या व झावळ्यांचाच वापर केला गेला.

मंदिरातील देवताना पोंगलचा नैव्यद्य अर्पण करून विधीपूर्वक पूजा, मंत्रोच्चार आणि आरती करण्यात आली. महिलांनी केरळची परंपरा जपत स्वतः चुलीवर पोंगल तयार करून अर्पण केल्याने या उत्सवाला विशेष रंगत प्राप्त झाली. अय्यप्पा सेवा समितीच्या वतीने अध्यक्ष बाबू टायरवाले, उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सचिव वसंत सिंग, सहसचिव के. उदयकुमार व खजिनदार पी. सत्यान नायर यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून सर्व सहभागी महिलांना सहकार्य केले.

# फिरोदिया शिवाजियन्सचा वरिष्ठ पुरुष क्लब लीग स्पर्धेत प्रवेश, राज्यातील सर्वोच्च क्लब स्पर्धेत जिल्ह्याचा पहिल्यांदा सहभाग

### विजेत्या संघाला आय–लीग ३ मध्ये पदोन्नतीची संधी; ७ मार्च रोजी लोणावळ्यात मुंबई फुटबॉल क्लबविरुद्ध पहिली लढत



वरिष्ठ पुरुष क्लब लीग स्पर्धेत प्रवेश केलेल्या फिरोदिया शिवाजियन्स संघातील खेळाडू.

नगर – अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्रात पहिल्यांदाच उत्कृष्ट कामगिरी करत फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लबने वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन वरिष्ठ पुरुष क्लब लीग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. अहिल्यानगरमधील एखाद्या क्लबला प्रथमच या राज्यस्तरीय सर्वोच्च व्यावसायिक स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाली आहे.

ही तीन टप्प्यांत पार पडणारी स्पर्धा ७ मार्च २०२६ पासून लोणावळा (जि. पुणे) येथे सुरू होणार आहे. फिरोदिया शिवाजियन्सचा संघ ६ मार्चला लोणावळ्याकडे रवाना होणार असून, जिल्ह्याच्या फुटबॉल इतिहासातील हा अत्यंत अभिमानास्पद क्षण ठरला आहे.

या स्पर्धेला विशेष महत्त्व आहे. कारण विजेत्या संघाला राष्ट्रीय स्तरावरील आय–लीग ३ मध्ये पदोन्नतीची संधी मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्वोत्तम संघांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्याबरोबरच राष्ट्रीय पातळीवर झेप घेण्याची संधीही क्लबसमोर आहे. अहिल्यानगरसारख्या जिल्ह्यातून आलेल्या संघासाठी ही स्पर्धा म्हणजे केवळ सहभाग नव्हे, तर व्यावसायिक फुटबॉल क्षेत्रात मोठी झेप घेण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.

क्लबच्या या ऐतिहासिक यशामागे प्रशिक्षक मंडळाची सातत्यपूर्ण मेहनत आहे. प्रशिक्षक मंडळात जेव्हिअर स्वामी, सचिन पठारे, राजेश अँथनी, पल्लवी सैंदाणे, श्रेया सागडे आणि अभिषेक सोनवणे यांचा समावेश असून त्यांनी संघाची काटेकोर तयारी करून घेतली आहे.

संघात मयूर गोरखा, रोशन रिकामे, प्रदीप सिंह, शुभम राऊत, अभिजीत निकोल्सन, रौनक जाधव, अभय साळवे, अरमान फकीर, सार्थक भोसले, शाह नवाज, अतुल डे, हिमांशू थोरात, सलमान शेख, सुयोग महागडे, उत्कर्ष सोनवणे, ऋषभ मणी, साहिल कुसाळकर, जोएल पठारे, नील धेंडवाल, शुभम शिवानंद, ओईनाम महेश, इम्रान शेख, अनोश कामाठी, इमॅन्युएल पिल्ले आणि दर्शन पवार या खेळाडूंचा समावेश आहे.

संघाचे फिजिओथेरपिस्ट म्हणून डॉ. आश्री बगदादी कार्यरत असून खेळाडूंच्या तंदुरुस्तीवर विशेष भर दिला जात आहे. फिरोदिया शिवाजियन्सचा पहिला सामना ७ मार्च रोजी बलाढ्य मुंबई फुटबॉल क्लब विरुद्ध होणार आहे. या सामन्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अनुभवी आणि मजबूत संघाविरुद्ध खेळताना फिरोदिया शिवाजियन्सची खरी कसोटी लागणार आहे. या यशात अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे क्लबने नमूद केले आहे. तसेच सराव व तयारीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालय या स्थळ भागीदाराचे आभार मानण्यात आले आहेत.

क्लबचे सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांनी सांगितले की, फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब हा क्लबचा दर्जा उंचावण्यासाठी आणि अहिल्यानगरचे राज्य पातळीवर अभिमानाने प्रतिनिधित्व करण्यासाठी कटिबद्ध आहे. राज्याच्या सर्वोच्च स्तरावर सहभाग नोंदवत फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लबने अहिल्यानगरच्या क्रीडा विश्वात आपली छाप सोडली आहे.

# ‘हिरवे ना भगवे, माणुसकीचे रक्त लाल असते’ ना जातीचे ना धर्माचे, शिवराय सर्व जातीचे

### प्रा. सुभाष वारे यांचे प्रतिपादन, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात, विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणातून भारताच्या विविध संस्कृतींचे दर्शन

नगर – निसर्गाने प्रत्येकाला माणूस म्हणून जन्म दिला आहे; जाती–धर्म या नंतरच्या उतरंडी आहेत. शिक्षणातून विद्यार्थी ‘माणूस’ म्हणून घडला पाहिजे. हीच आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी हालअपेष्टा सहन करून शिक्षणाची दारे बहुजनांसाठी खुली केली. हा वारसा कर्मवीर अण्णा व लक्ष्मीबाई यांनी पुढे चालवला आणि शिक्षणाच्या चळवळीतून बहुजनांची मुले शिकवली, असे प्रा. सुभाष वारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून सगळ्या कळ्या उमलू उद्या... सगळे फुल फुलू द्या! रक्त भगवे, हिरवे नसते... माणुसकीचे रक्त फक्त लाल असते! ना जातीचे ना धर्माचे, शिवराय सर्व जातीचे! या घोषणाही दिल्या.

रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. विद्यार्थ्यांनी आषाढीतील दिंडी, कोळीगीत, साउथ इंडियन व काश्मिरी गीत तसेच ठसकेदार मराठमोळी लावणी सादर करून भारतातील विविध प्रांतांच्या संस्कृतीचे रंगमय दर्शन घडवले. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य आणि छत्रपती संभाजी महाराजांचा संघर्ष व पराक्रम विद्यार्थ्यांनी रंगमंचावर प्रभावीपणे साकारला. या प्रसंगी सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन कर्मवीर भाऊराव व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्ष प्रा. सुभाष वारे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, अ‍ॅड. रवींद्र शितोळे, जनकल्याण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. शिवाजी विधाते, अनिल साळुंखे, माजी प्राचार्य के.एच. शिंदे, अर्जुनराव पोकळे, संस्थेचे लाईफ मेंबर सदस्य शिवाजी लंके, शब्दगंधचे सचिव सुनील गोसावी, स्कूल कमिटी सदस्य श्यामराव व्यवहारे, शेखर व्यवहारे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.





लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय यांचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. विद्यार्थ्यांनी भारतातील विविध प्रांतांच्या संस्कृतीचे रंगमय दर्शन घडवले. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी सांगितले की, शाळा गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर असून अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये शालेय विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत तसेच जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत मोठ्या संख्येने चमकले आहेत. कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांची उल्लेखनीय प्रगती सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वाचनातून साहित्याकडे वळावे. वाचनाची आवड निर्माण झाली तर जीवन समृद्ध होते. वह्या खरडणे म्हणजे शिक्षण नव्हे; ज्ञान, बुद्धी आणि माणुसकी शिक्षणातून विकसित व्हावी. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले शिक्षणच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना टिकवू शकते. शिक्षणात संस्कारांचा अंतर्भाव असावा. मन, मेंदू आणि मनगट सक्षम करणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असावे. मानवतावादी विचारातून राष्ट्रनिर्मिती झाली पाहिजे, तेव्हाच देश घडेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शब्दगंधचे सुनील गोसावी यांनी विद्यार्थ्यांना मोठे होण्यासाठी पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला.

गणेश वंदनेने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. मराठी तडका, बॉलीवुड गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. मल्हारी रिमिक्स आणि मराठी रिमिक्सने धमाल उडवली. देशासाठी बलिदान देणाऱ्या भारतीय जवानांसाठी सादर करण्यात आलेल्या विशेष गीताने वातावरण देशभक्तीमय झाले. गोंधळ गीताद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम साकारण्यात आला. ‘छावा’ चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा प्रसंग रंगमंचावर उभा राहताच उपस्थित प्रेक्षक भारावले. पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता दोमल, स्मिता पिसाळ आणि प्रदीप पालवे यांनी केले. शिवाजी लंके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उर्मिला साळुंके, मिनाक्षी खोडदे, रुपाली वाबळे, अमित धामणे, मंगेश कारखिले, जयश्री खांदोडे, शितल रोहोकले, भाग्यश्री लोंढे, भारती राऊत, इंदूमती दरेकर, पुनम घाडगे, सोनाली अनभुले, कांचन मदने, रूपाली गाडे, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



बालरंगभूमीच्या आरोग्य शिबिराला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# बालरंगभूमीच्या आरोग्य शिबिराला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर – बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्ष अ‍ॅड. निलम शिर्के–सामंत ह्यांच्या प्रेरणेने येथील बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखा आयोजित व डॉ.अनिल जाधव अ‍ॅण्ड आय.सी.यु. सेंटर यांच्या सहकार्याने खास बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर ३ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील ५० हुन अधिक सभासदांनी याचा लाभ घेत ब्लड शुगर, बी.पी., वजन, इ.सी.जी चाचणी करून घेतली.

यावेळी डॉ.अनिल जाधव यांनी उपस्थित सभासदांना आरोग्याविषयी सोप्प्या गोष्टी सांगत मार्गदर्शन केले ज्यात मीठ आणि साखरेचे सेवन कमी केल्याने होणारे फायदे, ताजे आणि घरगुती अन्न खाण्याला प्राधान्य, दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा व्यायाम आरोग्यासाठी कसा फायदेशीर ठरतो यासह डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्वतःहून (Self-medication) कोणतीही औषधे घेऊ नये, विशेषतः अँटीबायोटिक्सचा वापर केवळ डॉक्टरांच्या सांगण्यानुसारच करा असे आवाहन करण्यात आले.

चर्चासत्रात सभासदांनी उत्स्फूर्तपणे विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे डॉ.अनिल जाधव अ‍ॅण्ड आय.सी.यु. सेंटरमध्ये मिळाल्याने शिबिराचे आयोजन सगळ्यांच्याच दृष्टीने उपयुक्त ठरले असे मनोगत शिबिर प्रमुख सुजाता पायमोडे यांनी व्यक्त केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रसाद भणगे यांसह शैलेश देशमुख, सतीश लोटके, अनंत जोशी, विराज अडगटला, देवीप्रसाद सोहोनी, सागर अलचेट्टी, प्रशांत सूर्यवंशी, अविनाश बोधले, तेजस अतितकर, तेजा पाठक, टीना इंगळे, सोनाली दरेकर व ऋतुजा पाठक यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रिया देशमुख यांनी केले. सपना साळुंके यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने उजळला राष्ट्रीय विज्ञान दिन



महाराष्ट्र पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज येथे राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्ताने आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती दराडे व अंकुश दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – महाराष्ट्र पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज, अहिल्यानगर येथे २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सौ. स्वाती दराडे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रयोगांचे व वैज्ञानिक मॉडेल्सचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने मांडलेल्या प्रयोगांमधून त्यांच्या जिज्ञासू आणि संशोधक वृत्तीचे दर्शन घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये ई–वेस्टपासून तयार केलेली वैज्ञानिक मॉडेल्स व वैज्ञानिक खेळणी, विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर प्रेझेंटेशन तसेच विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादरीकरण अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेनुसार अनेक नाविन्यपूर्ण प्रयोग पवनचक्की, सौरऊर्जा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, शेततळे, ठिबक सिंचन, पाण्याचे शुद्धीकरण, जलचक्र, सूर्यमाला, पाण्याची घनता, हवेचा दाब, प्रकाशाचे अपवर्तन, आंतरेंद्रिये व फुफ्फुसांचे कार्य अशा विविध विषयांवरील मॉडेल्स आणि प्रयोगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या प्रयोगांमुळे उपस्थित पालक आणि पाहुण्यांना विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष अनुभवता आल्या.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश दराडे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा कायम जागृत ठेवून प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची सवय लावावी, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे देशात अधिकाधिक वैज्ञानिक निर्माण होण्यास प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हेमा कोंगे यांनी आपल्या मनोगतात पालकांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. पालकांनी प्रयोगशीलता आणि वाचनसंस्कृती जोपासल्यास तो दृष्टिकोन मुलांमध्येही विकसित होईल, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन विज्ञान विभागाच्या शिक्षिका सौ. शुभांगी काटे, सौ. पल्लवी दरंदले आणि झोया पठाण यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह पालकांनी उपस्थिती दर्शविली.

# महापालिकेत स्थायी समिती भाजपकडे; महिला-बालकल्याण समिती राष्ट्रवादीकडे

**१० मार्चला सभापती-उपसभापतींची निवड; आनंद भंडारी राहणार पीठासीन अधिकारी**

नगर – अहिल्यानगर महापालिकेतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील सत्ता वाटपाच्या सूत्रानुसार स्थायी समितीचे अध्यक्षपद भाजपकडे, तर महिला व बालकल्याण समितीचे अध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याचे निश्चित झाले आहे. या दोन्ही समित्यांच्या सभापती व उपसभापतींची निवड १० मार्च रोजी विशेष सभेत होणार असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी हे या बैठकीचे पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी या निवडीसंदर्भात आदेश जारी केले आहेत. त्यानुसार १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता पालिकेच्या सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत प्रथम स्थायी समिती सभापती पदाची निवड प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उपसभापती पदांची निवड केली जाणार आहे. या निवड प्रक्रियेसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या युतीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली आहे. सत्ता वाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार पहिल्या टप्प्यात महापौरपद राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आले. त्यानंतर स्थायी समितीचे सभापतीपद भाजपला, तर महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्थायी समितीच्या सभापतीपदासाठी भाजपकडून बाबासाहेब वाकळे, सुभाष लोंढे यांच्या नावांची चर्चा आहे. वाकळे हे यापूर्वी महापौर राहिलेले आहेत. त्यामुळे स्थायी समितीसाठी लोंढे यांच्या नावावर पक्षश्रेष्ठींनी हिरवा कंदिल दाखविल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून दीपाली बारस्कर आणि अनिता शेटिया यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. बारस्कर या पहिल्यापासून महिला व बालकल्याण समितीसाठी आग्रही आहेत. त्यामुळे हे पद बारस्कर यांच्याकडे जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. समित्यांच्या सभापतींची निवड झाल्यानंतर महापौरांकडून विरोधी पक्षनेते आणि सभागृह नेत्यांच्या निवडीची पुढील प्रक्रिया सुरू होणार आहे.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही समित्यांसाठी नामनिर्देशन अर्ज ६ ते ९ मार्च दरम्यान (शनिवार-रविवार वगळून) सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत वितरित केले जाणार आहेत. अर्ज स्वीकृती ९ मार्च रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत नगरसचिव कार्यालयात केली जाईल. १० मार्च रोजी विशेष सभेत अर्जांची छाननी, निवड प्रक्रिया आणि आवश्यक असल्यास अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पार पडणार आहे.

# बलिदान मासानिमित्त अरणगावमध्ये ८ मार्चला रक्तदान शिबिराचे आयोजन



नगर – बलिदान मासानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने अरणगाव (ता. नगर) येथे ८ मार्च रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अरणगावातील श्री तुळजाभवानी माता मंदिरात रविवारी सकाळी आठ वाजेपासून या रक्तदान शिबिरास प्रारंभ होणार आहे. अहिल्यानगर ब्लड बँकेच्या सहकार्याने हे शिबिर होणार असून, शिव-शंभू प्रेमींनी या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ऐतिहासिक ग्रंथ देऊन होणार रक्तदात्यांचा सन्मान

शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास प्रोत्साहनपर भेट म्हणून शिवचरित्रकार बाबासाहेब पुरंदरे यांनी ऐतिहासिक समकालीन पुराव्यानिशी लिहिलेला एक हजार पानांचा ग्रंथ 'राजा शिवछत्रपती' हे शिवचरित्र तसे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे छायाचित्र देण्यात येणार असल्याची माहिती श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान अरणगाव विभागाच्या वतीने देण्यात आली.

### बलिदान मास म्हणजे काय?

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी यशस्वी लढा देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व गलितगात्र झालेल्या हिंदू समाजाला आत्मसन्मान मिळवून दिला. शिवरायांनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी साम्राज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळली. दुर्दैवाने शंभुराजे मोगलांच्या हाती सापडले व धर्मपरिवर्तनासाठी त्यांचा महिनाभर अनन्वित छळ करण्यात आला. परंतु संभाजीराजांनी ताठ मानेने मृत्यूला सामोरे जात धर्मासाठी बलिदान दिले. शंभुराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्वाभिमानासाठी दिलेल्या या बलिदानाची जाणीव सर्वांना राहावी, म्हणून संभाजीराव भिडे गुरुजी प्रणीत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेच्या वतीने फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावास्या या महिनाभराच्या काळात बलिदान मास पाळण्यात येतो. या काळात मुंडण करणे, पायात चप्पल न घालणे, आवडत्या वस्तूचा त्याग करणे, एक वेळ जेवण आदी नियम पाळले जातात.



हद्दपारी आदेशाचा भंग करणाऱ्या आरोपीला राहत्या घरी पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

# हद्दपारी आदेशाचा भंग करणाऱ्या आरोपीला पकडले

नगर – जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेला गुन्हेगार परवानगी शिवाय पुन्हा जिल्ह्यात वावरत असल्याची गोपनीय माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी सापळा रचत मुनाफ चांद शेख (वय ४५,रा.जेऊर बायजाबाई, ता.नगर) याला अटक केली. तो हद्दपारीचा आदेश मोडून तो आपल्या राहत्या घरी आल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत मुनाफ चांद शेख याला जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते.मात्र हा आदेश धुडकावून तो परवानगी न घेता पुन्हा जिल्ह्यात दाखल झाल्याची माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. माणिक चौधरी यांना मिळाली. त्यानंतर स.पो.नि. चौधरी यांनी पोलीस पथक तयार करून पो.हे.कॉ.राजू सुद्रिक, पो.कॉ. दीपक फुंदे व चालक पो.कॉ. राहुल ढाकणे यांना कारवाईचे आदेश दिले.

या पथकाने ५ मार्च रोजी जेऊर येथे त्याच्या राहत्या घरावर छापा टाकत मुनाफ चांद शेख याला ताब्यात घेतले. या प्रकरणी पोकॉ.दीपक रामदास फुंदे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, मुनाफ चांद शेख याच्यावर यापूर्वीही एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# कोयते घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तिघांना पाठलाग करुन पोलिसांनी पकडले



एमआयडीसी परिसरात कोयते घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – एमआयडीसीच्या चायनागेट परिसरातील वडगाव गुप्ता शिवारात लोखंडी कोयते हातात घेऊन दहशत माजवत स्कुटीवर फिरणाऱ्या तिघा तरुणांना एमआयडीसी पोलिसांनी पाठलाग करून पकडले आहे. या कारवाईत ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना ४ मार्च रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास गोपनीय माहिती मिळाली की, तीन जण लोखंडी कोयते हातात घेऊन चायनागेट, वडगाव गुप्ता शिवारात स्कुटीवर फिरत दहशत माजवत आहेत. त्यानुसार चौधरी यांनी तपास पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले असता तीन तरुण हातात लोखंडी कोयते घेऊन फिरताना दिसून आले. पोलिसांनी त्यांच्याकडे जाण्याचा प्रयत्न केला असता संशय आल्याने ते पळून जाऊ लागले. मात्र पोलिसांनी पाठलाग करून तिघांनाही जागीच पकडले. पकडलेल्या आरोपींमध्ये अनुज पोपट बोरुडे (वय २०, रा. जाधव मळा, वडगाव गुप्ता, ता. जि. अहिल्यानगर), पियुष प्रविण गायकवाड (वय १९, रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी, अहिल्यानगर) आणि यश अरविंद गायकवाड (वय १८, रा. डॉन बॉस्को कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून ॲक्सेस मोपेड तसेच दोन लोखंडी कोयते असा एकूण ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद परदेशी, पोलिस अंमलदार राकेश खेडकर, संदीप पवार, राजू सुद्रीक, सचिन आडबल, संदीप पितळे, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव आणि अक्षय रोहोकले यांच्या पथकाने केली.



कत्तलीसाठी डांबलेल्या जनावरांची सुटका करणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# कत्तलीसाठी डांबलेल्या सात जनावरांची सुटका

नगर – कर्जत तालुक्यातील वडगाव तनपुरे परिसरात कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या सात जनावरांची सुटका स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. संशयित आरोपींकडून १ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील वडगाव तनपुरे गावच्या शिवारात भैलुमेवस्ती येथे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काही गोवंशीय जनावरे कत्तल करण्याचे उद्देशाने आणुन मोकळ्या शेतात झाडाला डांबुन ठेवलेले असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांना मिळाली त्यानुसार पथकाने जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी सात गोवंशीय जनावरे आढळून आली. त्यांची सुटका करून एक लाख पस्तीस हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार संदीप मुरकुटे, विजय पवार, रिचर्ड गायकवाड, बाळासाहेब गुंजाळ, भगवान थोरात, विशाल तनपुरे यांच्या पथकाने केली.

# आफान बागवान याचा रमजानचा रोजा (उपवास)



नगर – पंचपीर चावडी भागातील बागवान गल्ली येथील अवघ्या तीन वर्षांच्या अमीन अहमद बागवान यांच्य मुलाने रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. अत्यंत कमी वयात रमाज़ानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना त्याने उपवास केल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. पहाटे त्याने सहेरी करुन नमाज अदा केली आणि संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला.

तब्बल तेरा तासांहून अधिक काळ त्याने निर्जली रोजा ठेवला होता. अमीन बागवान यांचा मुलगा आहे. आफान याने ठेवलेल्या रोजाबद्दल अम्मी, अब्बू, नाना, नानी, दादी, बडे अम्मी, बडे अब्बू, व बागवान गल्ली परिसरातील नागरिकांनी कौतुक करुन अभिनंदन केले.

# महाराष्ट्र शासन सांस्कृतिक मंत्रालय आयोजित ६ मार्च रोजी होणाऱ्या विशेष निवेदनासाठी अहिल्यानगर येथील सुहास मुळे यांना निमंत्रण



नगर – महाराष्ट्र शासन सांस्कृतिक मंत्रालयामार्फत ६ मार्च रोजी विलेपार्ले येथे मास्टर दिनानाथ मंगेशकर सभागृहामध्ये आयोजित जेष्ठ संगीतकार रामचंद्र यांच्यावर आधारित कार्यक्रमासाठी विशेष निवेदन करण्यासाठी अहिल्यानगर येथील आकाशवाणी दूरदर्शन संहिता लेखक निवेदक संगीत समीक्षक सुहासभाई मुळे यांना सांस्कृतिक संचलनालयाकडून संचालक श्रीराम पांडे यांच्याकडून विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची उपस्थिती आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामधील मूळ पुणतांबा येथे जन्मलेले आणि रहिवासी असलेले जेष्ठ श्रेष्ठ संगीतकार सी. रामचंद्र यांच्यावर आधारित या विशेष कार्यक्रमा चे आयोजन शासनाकडून करण्यात आले आहे.

# शेवगावात लॉजवरील कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा; तीन महिलांची सुटका

## लॉज मालकासह सहा जणांवर गुन्हा दाखल

नगर – शेवगाव येथे गेवराई रस्त्यावरील एका लॉजवर पोलिसांनी छापा टाकून महिलांच्या अनैतिक व्यापाराचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत लॉज मालकासह सहा जणांविरुद्ध स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पिटा) गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली.

पुणे (वानवडी) येथील फ्रीडम फर्म या सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते स्टीफन देविदास मस्कनळी यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेवगाव पोलिसांनी बुधवारी सायंकाळी गेवराई रस्त्यावरील हॉटेल राजयोग लॉज येथे धाड टाकली. या कारवाईदरम्यान तेथे तीन पीडित महिलांकडून अनैतिक देहव्यापार करून घेतला जात असल्याचे पोलिसांना आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी कृष्णा बापू झिरपे (रा. कोळगाव, ता. शेवगाव), प्रतिक मिलिंद रांधवणे (रा. माळीवाडा, शेवगाव), लॉज मालक बाबासाहेब रामभाऊ अंधारे, अजिंक्य विठ्ठल अंधारे (रा. शिवनगर, शेवगाव), अमोल पठाडे (रा. नेवासा) आणि अमर मारुती ढाकणे (रा. हसनापूर, ता. शेवगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध स्त्रिया व मुलींचे अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमाअंतर्गत कारवाई केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक बाजीराव सानप हे करत आहेत.

## एकाच दिवसांत २ अल्पवयीन मुलींचे अपहरण

नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील व बुरूडगाव या गावांमधून एकाच दिवसांत दोन अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडल्या असून, या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अपहरणाचे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चिचोंडी पाटील गावात राहणाऱ्या १७ वर्षीय मुलीला २ मार्च रोजी सकाळी ११.३० ते १२.३० वाजताच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले. तिच्या कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला असता ती मिळून न आल्याने दुसर्या दिवशी ३ मार्च रोजी तिच्या वडिलांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या घटनेत बुरूडगाव येथील १६ वर्षीय मुलीला २ मार्च रोजी रात्री १०.३० ते ३ मार्च रोजी पहाटे २ या दरम्यान राहत्या घरातून अज्ञात इसमाने पळवून नेले आहे. रात्री मुलगी घरातून बेपत्ता झाल्याचा प्रकार पहाटे दोन वाजता लक्षात आल्यानंतर फिर्यादीसह नातेवाईकांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यानंतर मुलीच्या आईने सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंद केला असून मुलीचा शोध सुरू केला आहे.

# सीए अंतिम परिक्षेत तृप्ती गांधी-बोरा यांचे यश



नगर – अथक प्रयत्न आणि जिद्दीच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सीए तृप्ती गांधी-बोरा यांनी यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या Institute of Chartered Accountants of India (ICAI) आयोजित सीए फायनल या अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या परीक्षेत त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले.

तृप्ती निलेश बोरा यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. या यशामध्ये प्रितेश लुंकड, सीए किरण भंडारी, सीए नीलम भंडारी, सीए समीर शेख यांचे सहकार्य लाभले. तसेच श्रेयल श्रीजी महाराजसाहेब यांचे आशीर्वाद लाभले.

त्यांच्या यशामागे बहीण ममता मुनोत, आधारस्तंभ वसंत मुनोत तसेच मित्रपरिवार – रणजीत सुराणा, कविता भांबरे -घोलप, सीए दीपा घुले, सीए ऋषिकेश खोसे आणि सीए रवी आरसुळे – यांची मोलाची साथ लाभली. दरम्यान, त्यांचा एकुलता एक मुलगा रोहन निलेश बोरा हाही सीए फायनल परीक्षेची तयारी करत असून त्यालाही त्या मार्गदर्शन करत आहेत.


## जाहीर प्रगटन ०५/०३/२०२६

**ग्रा.पं.चिंचोली रमजान ता.कर्जत, जि.अहिल्यानगर** यांजकडून या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गावठाण अंतर्गत चिंच झाडांच्या फळाचा जाहीर लिलाव दि.१२/०३/२०२६ गुरुवार रोजी सकाळी ठीक ०९:३० वा. ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला असुन ज्यांना कोणाला लिलाव घ्यावयाचा आहे त्यांनी लिलावासाठी उपस्थित रहावे ही विनंती.

**लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**
१)चिंच फळ लिलावासाठी डिपॉझिट १०,०००/- (दहा हजार रुपये) राहील. २)लिलाव घेतल्यानंतर लिलावाची पुर्ण रक्कम भरल्यानंतरच चिंचफळे तोडण्यास ग्रा.पं. परवानगी देईल. ३)चिंच लिलावासाठी ज्या व्यक्तिने डिपॉझिट भरले आहे. त्यांनाच लिलावात भाग घेता येईल. ४) सर्वात जास्त लिलाव खोली बोलण्यास लिलाव दिला जाईल. ५) लिलाव देण्याचा किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार ग्रामपंचायतीला राहील. ६) डिपॉझीट भरुन लिलाव बोली बोलण्याचा अधिकार लिलाव धारकास राहील, लिलाव बोलण्यासाठी गाव, तालुका, जिल्हा मर्यादा लागु नाही.

शिक्का

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचयत चिंचोली रमजान, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर

सही/-
प्रशासक ग्रा.पं.
चिंचोली रमजान



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. ०५/०३/२०२६.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे निंबळक येथील शेतजमिन** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे – **गट नंबर ३७० चे एकूण क्षेत्र ४ हे.०६ आर याचा आकार १५ रु.०६ पैसे. यापैकी २ हे. १४ आर ही संपूर्ण शेतजमिन मिळकत.**

**यांसी चतुःसीमा –**
पूर्वेस : गट नं.३८०, ३७२ व ३७१ दक्षिणेस : गट नं.३६८
पश्चिमेस : रस्ता व गट नं.३६९ उत्तरेस : गट नं.३७४

**वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**१. सय्यद अमीर कासम, २. इकबाल मिठुभाई सय्यद, ३. अन्सार मिठुभाई सय्यद, ४. सायरा मुस्ताक सय्यद, ५. मुमताज हबीबब शेख व ६. इंताज अस्लम शेख. सर्व रा. अहिल्यानगर.**

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. 9011678999, 9860805559



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.ऋषिकेश सुनिल बांडे रा.शिवाजी नगर, केडगाव,अहिल्यानगर व श्री.सचिन नंदराम कराळे रा.वाकोडी ता.जि.अहिल्यानगर हे असून सदर मिळकत त्यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विरहीत तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच **५ दिवसांच्या** आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम हे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन**– अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगाव** येथील सर्व्हे नंबर ४२४/१/४२५/३ मधील बिनशेती प्लॉट नंबर ३६ क्षेत्रफळ १५०.०० चौ.मी. यावर आर.आर.सी.बांधकाम झालेल्या ''जगदंब कॉम्प्लेक्स'' या इमारतीमधील तळ मजल्यावरील शॉप नंबर २ चे कारपेट क्षेत्रफळ १४.६४ चौ.मी.,बिल्टअप क्षेत्र १६.७० चौ.मी.असे एकूण सेलेबल क्षेत्र २१.७१ चौ.मी. ही मिळकत.

**यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे**
पुर्वेस – प्लॉट नंबर ३७ पश्चिमेस – शॉप नंबर १
दक्षिणेस – रस्ता उत्तरेस – स्टेअर केस
येणे प्रमाणे चतुर्सिमा पूर्वक शॉप मिळकत त्यामधील वागणुकीच्या व वहिवाटीच्या हक्कासह असे.

दि.०५/०३/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर**
ऑफिस-तळ मजला, आनंद हाईट्स,
जुने जिल्हा न्यायालयासमोर,अहिल्यानगर, मो : ९९२२२२७१७८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. विकास विठ्ठल जाधव रा. अ.नगर** यांनी ती मिळकत निर्वेध निजोखमी बोजारहित असलेबाबत आमचे अशिलास खात्री व भरवसा देऊन सदर मिळकत विक्री करणेबाबत आमचे अशिलांबरोबर सौदा, ठराव केलेला आहे. त्या मिळकतीचे खरेदीखत आमचे अशिल करून घेणार आहेत. तथापि परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात कोणाच्याही गहाण, दान बक्षिसपत्र, वारसाहक्क, अन्नवस्त्र बोजा, कोर्टजप्ती, मनाई हुकूम, चालु वाद अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती तक्रारी खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसात समक्ष कळवाव्यात. मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती प्राप्त न झालेस आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**''परिशिष्ट'' मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहमदनगर पोट तुकडी ता.नगर पैकी मौजे माळीवाडा येथील शहर अ.नगर येथील अ.नगर महानगरपालिका हद्दीतील मिळकत खालील वर्णनाची

| सर्व्हे नं. | क्षेत्रफळ |
|---|---|
| ७१८५ | ३३.४० |

**यांसी चतु:सीमा :**
पुर्वेस :- मच्छी बिल्डींगचा भाग दक्षिणेस :- मोकळी जागा
पश्चिमेस :श्री.जपे यांची मिळकत,उत्तेस :- सि.स.नं.४५५५/अ२/अई/अ५
येणेप्रमाणे चतु:सीमा पुर्वक मिळकत आणि मालकी हक्काच्या, वागणुकीचे, वहिवाटीचे व इतर हक्कासह त्यात असलेल्या सर्व तदंगभुत वस्तुसुद्धा काहीही एक राखून न ठेविता.

तारीख – ०५/०३/२०२६
अ.नगर

**ॲड.आर.एम.ढाकणे**
मो.नं.९९२२१७२२४४, अहिल्यानगर



## फॉर्म ४ (नियम ८ पहा)

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ – | २७२३, आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर (महाराष्ट्र) |
| २) प्रसिद्धीचा काळ – | दैनिक (दररोज सायंकाळी) |
| ३) मुद्रकाचे नाव – | सुभाष चंदनमल गुंदेचा |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | २७२३, आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर |
| ४) प्रकाशकाचे नाव – | सुभाष चंदनमल गुंदेचा |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | २७२३, आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर |
| ५) संपादकाचे नाव – | सुभाष चंदनमल गुंदेचा |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | २७२३, आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर |
| ६) वृत्तपत्रांची मालकी असणारे आणि वृत्तपत्राच्या एकूण भाग भांडवलापैकी एक टक्क्याहून अधिक भाग धारण करणारे भागधारक, भागीदार यांची नावे व पत्ते – | सुभाष चंदनमल गुंदेचा २७२३, आचार्य गुंदेचा चौक, गंजबाजार, अहिल्यानगर ४१४ ००१. |

मी सुभाष चंदनमल गुंदेचा असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य आहे.
दिनांक १.३.२०२६

